## <u>नियमित दिवाणी दावा क्र.९८९/२०१८ मधील नि.६३ वरील आदेश</u>

*<u>(सखाराम यशवंत बर्डे व इतर विरुध्द दत्तु किसन बर्डे व इतर)</u>*

सदरचा अर्ज मयत प्रतिवादी नं.६ यांचे वारस दाव्याच्या अभिलेखावर दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी नं.१ब ने सदरचा अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा वाटप व मनाईचे कामी दाखल केलेला असुन दाव्याचे कामकाज चालु असतांना सदरच्या दाव्यातील प्रतिवादी नं.६ हे दिनांक ०२/०१/२०१९ रोजी मयत झालेले असुन त्यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत. सबब, या दाव्यात प्रतिवादी नं.६ चे वारस सामील करणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवदी नं.६ चे नावापुढे मयत असा शेरा घेऊन खालीलप्रमाणे वारस दुरुस्ती करण्याची विनंती केलीः–

प्रतिवादी नं.६ नामदेव यशवंत वर्डे, मयत

| | | | |
|---|---|---|---|
| वारस | ६अ– | दादा नामदेव बर्डे, वय ५५ वर्षे, | मुलगा |
| | ६ब– | ज्ञानदेव नामदेव बर्डे, वय ५२ वर्षे, | मुलगा |
| | ६क– | चांगदेव नामदेव बर्डे, वय ५० वर्षे, | मुलगा |

सर्वांच धंदा – शेती, सर्व रा. खानापुर (सोमय्या फार्म), ता. श्रीरामपुर, जि.अहमदनगर.

वरीलप्रमाणे प्रतिवादी नं.६ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावे व तशी दाव्यात दुरुस्ती करण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

**०३.** सदर अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की, अर्ज खरा व बरोबर नाही, प्रतिवादी यांना मान्य नाही, वादी यांनी जाणूनबुजून उशी केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर केल्यास कॉस्टचा हुकूम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदर अर्जाकामी वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी नं.६ हे मयत झालेबाबत त्यांचे मृत्यूचे प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. सदर दावा

दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप बदलत नाही. सदर दावा गुणांवगुणावर निर्णीत होण्यासाठी प्रतिवादी नं.६ चे वारस अभिलेखावर दाखल करुन मागणीप्रमाणे दावा दुरुस्ती गरजेची आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही व दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. सदरची दावा दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहेः–

**आदेश**

१. अर्ज (**नि.६३**) मंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

संगमनेर<br>
दि.१०/०३/२०२५.

स्वाक्षरीत/–<br>
( श्रीमती एस. बी. ढवळे )<br>
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.